# गरुडझेप

## सारांश

लेखक भरत आंधळे यांनी जीवनात येणाऱ्या अडचणीवर मात करीत करीत आपल्या ध्येयाचा प्रवास कसा पूर्ण केला याचे वर्णन केलेले आहे.

लेखक ग्रामीण भागातले असल्यामुळे तेथे शिक्षणाचा प्रचार व प्रसार कमी होता. कुटूंबातून पहिलेच शाळेत जाणारे ठरतात. घरची परिस्थिती बेताचीच, खडतर पर्यत करुन लेखन दहावीची परीक्षा पास होतात. पुण्याला जावून आय.टी.आय.ची परीक्षा पास होउन खाजगी नोकरीही करतात त्याकाळात त्यांना सुशिक्षीत मित्रपरिवाराची मदतही मिळते.त्यामुळे लेखक आपले पुढचे शिक्षण पुर्ण करतात आणि स्पर्धा परीक्षेच्या तयारीला लागतात.

एका कंपनीत नोकरीही करतात. पीएसआय व्हायचे स्वप्न पूर्ण करतात. मित्राच्या सल्ल्यानुसार अनेक ध्येय पार करीत लेखकाने आता युपीएसी परीक्षा पास करायचे ध्येय मनाशी बाळगले होते. पूणे विद्यापीठात शिक्षण घेतानाच कमवा आणि शिका या तत्वावर त्यांनी पुढची वाटचाल सुरु केली.

लेखक भरत आंधळे यांचा संघर्ष जिवनात येणाऱ्या अनेक अडचणींना सामोरे जाण्याची बळ देणारा आहे. लेखकांनी 'प्रत्येक अपयश ही यशाची पहिली पायरी असते.' असे ब्रीदच जणू ठरवून टाकले होते. पी.एस.आय., एम.पी.एस.सी, यु.पी.एस.सी. ची परीक्षाही त्यांनी पास केली. यु.पी.एस.सी. ची मुलाखत देण्याकरीता सर्व तयारीनीशी सज्ज झाले होते. मुलाखत ही उत्तम प्रकारे पार पाडून गावाला परत जातात. गावातील लोक लेखकांची थट्टाही करतात परंतु लेखकांना त्यांच्या मेहनतीवर विश्वास असतो. काही दिवसातच त्यांना आनंदाची वार्ता कळते त्यांनी मुलाखतीची परीक्षाही पास केलेली असते.गावात लेखकांचा सत्कार केल्या जातो.अशाप्रकारे त्यांच्या अथक प्रयत्नांना यश आलेले असते.

'गरूडझेप' यापुस्तकात लेखकांनी जिवनात येणाऱ्या अनेक अडचणीवर मात करून यश कसे संपादन केले याचे वर्णन आलेले आहे.

# भाषाविज्ञान परिचय

## रुपिम व पदविचार

स्वनिमाला स्वत:चा अर्थ नसतो पण ज्यावेळी या स्वनिमांची सानुक्रम रचना होते त्यावेळी त्यांना 'रुपिका' असे म्हणतात.

**भाषेची दुहेरीरचना :–** मानवी भाषा ध्वनिरुप आहे. प्रत्येक भाषेत ध्वनी ठराविक पद्धतीने वापरले जातात त्यांना स्वनिम म्हणतात. स्वनिमांच्या निरनिराळया रचना वेगवेगळा अर्थ व्यक्त करतात या रचनेला 'भाषेची दुहेरी रचना' असे म्हणतात.

प्रत्येक भाषेत स्वतंत्र व स्वत:ची एक 'स्वनिम व्यवस्था' असते. तसेच भाषेत समाविष्ट असणाऱ्या स्वनिमांच्या सानुक्रम रचना करुन अर्थ धारणा कशी करावयाची याची एक स्वतंत्र्य व्यवस्था भाषेत असते. त्यांच्या सार्थ घटकांना पदविचार असे म्हणतात.

पद म्हणजे शब्द

भाषेत वापरली जाणारी वाक्ये पदांची किंवा पदबंधाची बनलेली असतात.

भाषेतील लघुत्तम अशा भाषिक रुपाला रुपिका असे म्हणतात.

**रुपिकांचे दोन प्रकार आहे.**

१) मुक्त रुपिका
२) बद्ध रुपिका

**रूपिका—रूपिम—रूपिकांतर**

भाषेत येणारे भाषिक रूप म्हणजे रूपिका

भाषेतील समान कार्यकरणाऱ्यारूपिकांच्या गटाला रूपिम म्हणतात

एका विशिष्ट गटात समावणाऱ्या रूपिकांनाच रूपिकांतरे म्हणतात

स्वनिमाश्रयी    रूपिकाश्रयी

**रूपिमांचे प्रकार**

<u>आशयसुचक रूपिम</u>

रूपिकाव्दारा वस्तू विचार भावनांचा बोध होणे
(मुक्त रूपिम)

<u>कार्यसुचक रूपिम</u>

स्वत:चा आशय नसून सार्थ रूपाची जुळणी करतात

साधक प्रत्यय    विकारी प्रत्य

शब्दसिध्दी म्हणजे काय?
भाषेतील लघुत्तम सार्थरूप म्हणजे रूपिका या रूपिकापासून तयार होणाऱ्या प्रक्रियेला शब्दसिध्दी किंवा शब्द घटना म्हणतात.

**शब्दसिध्दी**

<u>साधक प्रत्यय</u>

साधक प्रत्यय लागून तयार होणाऱ्या शब्दांना साधित शब्द म्हणजे प्रत्यय असलेला धातूच होय.नाम,सर्वनाम,विशेषण,क्रियापद या धातूंना साधक प्रत्यय लागतात.

<u>विकारी प्रत्यय</u>

यात मुळ धातुच्या रूपात बदल घडून येतो या प्रत्ययांना विकारी प्रत्यय हे चरम प्रत्यय असतात.

# प्रमाणभाषा आणि बोली

जी भाषा सतत वापरात असते. सातत्याने बदलत असते. भाषेतील बदल कालानुसार,स्थळानुसार,प्रसंगानुसार व व्यक्तीनुसार होत असतो. महाराष्ट्राची प्रमाणभाषा मराठी असली तरी मराठी भाषा बोलण्याच्या अनेक पध्दती आहेत. व्याकरण,लिपी व लेखनविषयक नियम यांनी युक्त भाषेचे रूप म्हणजे प्रमाणभाषा.

## प्रमाणभाषा

ऐतिहासिक परंपरा आणि रूढी यांना अनुसरून एखाद्या प्रदेशातील वा राज्यातील मुख्यनगरातल्या सुशिक्षीतांच्या बोलण्याला 'प्रमाणभाषा' म्हटले जाते.

## बोली

कुठल्यातरी प्रमाणभाषेच्या बोलण्यात रूढ असलेल्या रूपाला 'बोली' असे म्हटले जाते. एखाद्या प्रातांतील लोकसमुह प्रामुख्याने जी भाषा बोलतात त्यांना बोली म्हणता येते.
परस्परसंबंध

१) बोली आणि प्रमाणभाषा यामध्ये सारखेपणा आणि वैविध्य ही असते.

२)प्रमाणभाषा केंद्रवर्ती असल्यामुळे सर्वच बोली भाषांना तिचा परिचय असते.

३) बोलीपेक्षा प्रमाणभाषा औपचारिक असते.

४) प्रमाणभाषा लेखनाची भाषा असल्याने साम्यभेदाचे प्रमाण कमी असते.

५)प्रमाणभाषेच्या अंतर्गत अनेक बोली सामावलेल्या असतात.

६)सीमाक्षेत्रावरील बोलीत भाषामिश्रण आढळते.

## कालिकभेद म्हणजे काय?

भाषेच्या प्रवाहित्वामुळे एकाच भाषेमध्ये कालपरत्वे जे भेद दिसुन येतात त्यांना कालिक भेद असे म्हणतात.

कालिकभेद म्हणजे कालाप्रमाणे भाषेत घडून येणारे बदल दृ

मराठी भाषेचे पाच कालखंड मानतात.

१) मराठीच्या जन्माापासून इ.स. १३५० पर्यत — यादवकाल

२) इ.स. १३५० ते इ.स.१६०० पर्यत — बहामनीकाल

३) इ.स. १६०० ते इ.स. १७०० पर्यत —शिवकाल

४) इ.स. १७०० पासून इ.स.१८५० पर्यत — पेशवेकाल

५) इ.स. १८५० ते १९९० व पुढे — आंग्लकाल

कालिकभेद मानताना भाषेचे कालखंडही पाडण्यात आलेले आहे

१) प्राचीन कालखंड. २)मध्ययुगीन कालखंड. ३) अर्वाचीन कालखंड

कालिकभेद म्हणजे एकाच भाषेत घडून येणारे परिवर्तनाचे टप्पे होत.

## प्रांतिकभेद वा प्रादेशिक भेद

प्रमाणभाषेअंतर्गत येणाऱ्या विविध बोली म्हणजेच प्रमाणभाषेचे प्रादेशिक भेद होय.प्रदेशानुसार बोलण्याच्या भाषेत जे भेद आहेत त्यांना प्रादेशिक भेद म्हणतात. मराठी भाषेचे प्रादेशिक भेद वऱ्हाडी, अहिराणी, हळबी, कोकणी, डांगी हे आहेत.

# प्राचीन वाङ्.मयाचा इतिहास

## बखर वाङ्मय

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्य स्थापना झाली. शिवकाळातील गद्य ग्रंथ म्हणून बखर वाङ्मयाचे स्थान महत्त्वपूर्ण असे आहे. मराठे शाहीचा वाङ्मयीन सौंदर्याचा गद्यचा नमुना म्हणून बखर वाङ्मयाकडे पाहिले जाते.

'बखर' हा शब्द 'खबर' (वार्ता समाचार) अरबी या शब्दाचा विपर्यास होऊन बखर शब्दाची निर्मीती झाली असावी असे म्हटले जाते. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी बक म्हणजे बोलणे या शब्दापासून 'बखर' हा शब्द निर्माण झाला आहे असे मत व्यक्त केले आहे.

'बखर' शब्दाचा अर्थ राजकीय स्वरुपाचे ऐतिहासिक लेखन असा आहे. रचनाकाळाच्या दृष्टीने 'महिकावतीची बखर' ही सर्वात जुनी बखर होय. बखरीचे काही प्रकार सांगता येतात.

१) **पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या राजकीय घटनांवर आधारीत बखरी** :— यामध्ये बखरकार ऐतिहासिक घटना डोळयापूढे घडल्याप्रमाणे संपूर्ण माहिती देत असतो.

२) **पारंपारीक दंतकथा, हकिकती, आठवणी, आख्यायिका यांच्या आधारे लिहिलेल्या बखरी** :— या बखरी आठवणीवर हवाला ठेवून लिहिलेल्या असतात. कृ.वि. सोहणी यांची 'पेशव्यांची बखर' या प्रकारात मोडते.

३) **ऐतिहासिक कागदपत्रे, जुने ग्रंथ, टिपणे यावर आधारीत बखरी** :— या बखरी ऐतिहासिक आधार घेऊन लिहिलेल्या असल्यामुळे ऐतिहासिक सत्याच्यादृष्टीने विश्वसनीय असतात. मल्हार रामराव चिटणीस यांची 'सप्तप्रकरणात्मक चरीत्र' या प्रकारात मोडते.

४) **एतिहासिक बखरसदृश्य लेखन** :— यामध्ये वाका, कैफियत, हकीकत, चरित्र, आत्मचरित्र इ. लेखनाचा समावेश होतो. पटवर्धनी वाका, आगऱ्याची हकीकत, भाऊसाहेबांची कैफियत यांचा समावेश यामध्ये केला जातो.

बखरीत एतिहासिक व्यक्तींचे व घटनांचे वर्णन असले तरी बखर म्हणजे इतिहास नव्हे. बखरकार हे बहुतांशी आश्रित असल्याने धन्याचा गौरव, पक्षपातीपणा त्यांच्या लेखनात येणे स्वाभाविक मानल्या जाते. बखर वाङ्.मयाला इतिहास म्हणून संबोधता येत नाही असे म्हटले जाते.

## बखर : एक वाङ्मय प्रकार

**शिवपूर्वकालीन बखरी** :— मराठयांच्या स्वराज्यस्थापनेपुर्वीच्या बखरी या संख्येने कमी असल्या तरी वाङ्.मयीनदृष्टया महत्त्वाच्या आहेत. साधी व सोपी भाषा, घटनांचे आकर्षण निवेदन यामुळे या बखरी आकर्षण बनल्या आहेत.

**राक्षसतागडीची बखर** :— या बखरीत विजयनगरच्या विध्वंसाची माहिती मुळ कानडी बखरीच्या आधारे दिली आहे. व्यक्ती आणि घटनांचे तपशीलवार वर्णन यात लेखकाने केले आहे.

**शालिवाहनाची बखर** :— शालिवाहनाची बखर ही सर्वात जुनी बखर होय. या बखरीचे हस्तलिखित व मुद्रित पौराणिक पद्धतीने केलेले दिसते.

**शिवकालीन बखर** :— शिवाजी महाराजांच्या चरित्रावर शिवकालात बरेच लेखन झालेले दिसते. 'सभासदाची बखर' ही समकालीन आहे.

**सभासदाची बखर** :— हि बखर शिवकालीन होय. शिवाजी महाराजांच्या काळात लिहिल्या गेली. शिवाजी महाराजांचे चरित्र म्हणून त्याकडे पाहिले जाते. कृष्णाजी अनंत सभासद यांच्या बखरीला सभासदाची बखर म्हटले जाते.

**शिवदिग्विजय** :— खंडो बल्लाळ चिटणीस यांनी शिवाजीच्या चरित्रावर विस्तृतपणे वृत्तांत लिहीला आहे. त्यांची भाषा हि संस्कृत वळणाची आहे. बहुश्रुतता भाषा प्रभुत्व यामुळे बरेच वाङ्मयीन गुण यात आढळतात.

**पेशवेकालीन बखर** :— पेशवेकालीन बखरी या शिवकालीन बखरीपेक्षा विषय व आश्याच्या दृष्टीने वैविध्यपूर्ण वाटतात. पानिपतची बखर, भाऊसाहेबांची कैफियत, होळकरांची थैली, नाना फडणवीसांचे आत्मचरित्र या सर्व बखरी पानिपतच्या युद्धाचे वर्णन करणाऱ्या आहेत.

**पानिपतची बखर** :—गोपिकाबाईच्या आज्ञेवरुन रघुनाथ यादव चित्रगुप्त यांनी ही बखर लिहीली. पानिपतच्या युद्धानंतर दोन वर्षातच ती लिहिल्या गेली. पानिपतच्या युद्धाचे सूक्ष्म, वीरस्सपूर्ण असे वर्णन केलेले आहे.

**भाऊसाहेबांची कैफियत** :— त्रिंबक सदाशिव पुरंदरे यांनी ही बखर लिहिली आहे. ऐतिहासिक प्रामाण्याच्यादृष्टीने ही बखर महत्त्वाची समजली जाते.

**भाऊसाहेबाची बखर** :— इतिहास व वाङ्मय, भाषासौदर्य व विचार सौदर्य यांचा संगम या बखरीत दिसून येतो. वाङ्मय दृष्टयाही महत्त्वाची समजली जाते. व्यक्ति वर्णने, प्रसंगवर्णने आणि वस्तुवर्णने यांनी या बखरीला समृद्ध केले आहे. थोडक्यारत विविधात्मकता व विषयांचे वैचित्र्य हे पेशवेकालीन बखरीचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणावे लागेल.

ग.ब. ग्रामोपाध्ये म्हणतात, ''ज्या वीर युगाची सुरुवात स्वराज्य स्थापनेने झाली त्या वीरयुगाचा एक अपरिहार्य परिणाम म्हणजे बखरीची निर्मिती होय.

——— ००० ———